राज्यात माहे जून ते सप्टेंबर २०१३ पर्यंत अतिवृष्टी/ पूर यामुळे झालेल्या मत्स्य व्यवसाय नुकसानीबाबत आपद्ग्रस्तांना आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०१३/प्र.क्र.४८१ /म-३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २० डिसेंबर, २०१३

**वाचा -**

१) केंद्रीय गृह मंत्रालय, आपत्ती व्यवस्थापन विभाग यांचे स्थायी आदेश पत्र क्र. ३२-३/२०१३-एनडीएम-१, दि. २१.०६.२०१३.

**प्रस्तावना -**

राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१३ मध्ये नैसर्गिक आपत्ती (अतिवृष्टी / पूर) यामुळे राज्यात मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली होती. यासंदर्भात अन्य विहित नुकसानीबाबत वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे सदर नैसर्गिक आपत्तीमुळे मत्सव्यवसायाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मत्स्य व्यवसायीक आपद्ग्रस्तांना मदत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

राज्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१३ मध्ये नैसर्गिक आपत्ती (अतिवृष्टी / पूर) यामुळे राज्यात विशेषत: विदर्भात मोठया प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली होती. सदर नैसर्गिक आपत्तीमध्ये विदर्भातील मत्स्यव्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. केंद्र शासनाचे संदर्भाधीन पत्र, दिनांक २१ जून, २०१३ अन्वये, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीकरिता राज्य प्रतिसाद निधीतून द्यावयाच्या मदतीबाबत सुधारित दर जाहीर केले असून सदर निर्णयातील परिच्छेद ७ नुसार विदर्भात झालेल्या मत्स्यव्यवसायाच्या नुकसानीकरिता केंद्र शासनाच्या पुढील सुधारित दरानुसार मदत देण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

| क्र. | बाब | मदतीचे दर |
|---|---|---|
| १) | मत्स्य व्यावसायिकांना बोटीची दुरुस्ती, जाळी यासाठी मदत<br>-बोट<br>-होडी<br>-यांत्रिकी बोट<br>-जाळी<br>(आपत्तीप्रसंगी दुसऱ्या कोणत्याही शासनाच्या कोणत्याही योजनेखाली अनुदान/ मदत घेतली असल्यास मदत अनुज्ञेय नाही.) | • रु.३,०००/- बोटीची अंशत: दुरुस्तीसाठी<br>• रु.१,५००/- अंशत: बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी<br>• रु.७०००/- पूर्णत: नष्ट झालेल्या बोटींकरिता<br>• रु.१,८५०/- पूर्णत: नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी |
| २) | मत्स्योत्पादन केंद्रांसाठी मदत | रु.६०००/- प्रतिहेक्टर<br>(पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्योत्पादन विभाग, कृषी मंत्रालय यांच्या योजनेनुसार एकदा दिलेल्या अनुदाना व्यतिरिक्त, आपत्तीप्रसंगी दुसऱ्या कोणत्याही शासनाच्या कोणत्याही योजनेखाली अनुदान/ मदत घेतली असल्यास मदत अनुज्ञेय नाही. ) |

२. याकरिता आवश्यक असलेल्या नुकसानीबाबत पदुम विभागाने (मत्स्य व्यवसाय) सर्वेक्षण अहवालानुसार बाधित लाभार्थ्यांची यादी, बाधित मत्स्यव्यावसायिकांचे बँक खाते क्र.इ. माहिती संकलित करुन सबंधित जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. सदर मदतीबाबत आवश्यक त्या निधीकरीता योग्य तो प्रस्ताव कृषी व पदुम विभागाने (मत्स्यव्यवसाय) मदत पुनर्वसन विभागाकडे(अवर सचिव म-११ कार्यासन) सादर करावा.

३. मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करताना मदतीच्या रकमेतून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करु नये, यासाठी सहकार विभागाने योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

४. मत्स्यव्यवसाय नुकसानीबाबत मदत देण्याबाबतचा निधी उपलब्ध झाल्यानंतर पदुम विभागाने (मत्स्य व्यवसाय) मदतीचे वाटप खास मोहीम आखून त्वरित पूर्ण करावे. वाटप व खर्चाचे समायोजन कोणत्याही परिस्थितीमध्ये मार्च २०१४ पूर्वी पूर्ण करावे.

५. उपरोक्त मदतीसाठी लागणारा खर्च, "२२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (योजनेतर), ०२ पूर, चक्रीवादळे इत्यादी, ११८, हानी पोहोचलेल्या होड्या व मासेमारी साधनसामग्री यांची दुरुस्ती/ ती नव्याने पुरविणे यासाठी सहाय्य, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा. निधी उपलब्धतेबाबत योग्य ती कार्यवाही महसूल व वन विभागाच्या (मदत व पुनर्वसन) म-११ कार्यासनाने करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१२२०१६०४२४६७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Rajaram Jagtap

Digitally signed by Ashok Rajaram Jagtap
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ashok Rajaram Jagtap
Date: 2013.12.21 12:59:42 +05'30'

**अ. रा. जगताप**

अवर सचिव

प्रति,

१. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व मंत्रालयीन विभाग),
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, मुंबई.
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल कोषागार -२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
९. सह सचिव (कार्यासन म-११), मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. उपसचिव कृषी व पदुम विभाग, (पदुम-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, कृषी व पदुम विभाग, (पदुम-१३), मंत्रालय, मुंबई

१२. कार्यासन अधिकारी , कार्यासन( अर्थसंकल्प-६/व्यय-९) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१३. कार्यासन अधिकारी,कार्यासन (आव्यप्र-१/आव्यप्र-२/म-७/म-११/मंनिक), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कार्यासन अधिकारी, कार्यासन (१०-अे/१३-अे), कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनस्ती म-३ कार्यासन,

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
४. मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री,मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, यांचे स्वीय सहायक, विधानभवन,मुंबई.
८. सचिव,मदत व पुनर्वसन यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२
९. सचिव व संचालक, आपत्ती व्यवस्थापन, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.